सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कालमर्यादीत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/3019
दिनांक :- 30/09/2024

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील १२ वी नंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवीका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/औषधनिर्माणशास्त्र पदवीका/२०२४/४५४ दिनांक २० सप्टेंबर २०२४.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/२९५६ दिनांक २३ सप्टेंबर २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेची माहीती अचुक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. सदर माहिती आवश्यक कागदपत्रे सादर करुन दिनांक २७/९/२०२४ पर्यंत माहिती अद्ययावत करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापी ब-याचश्या संस्थांनी अजुनपर्यंत सदर माहीती अद्ययावत केलेली दिसुन येत नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी सदर माहिती अजूनपर्यंत अद्ययावत केलेली नाही अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता व त्यानुसार संबंधीत मंडळाचे सलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकी माहिती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या https://approval२४.dtemaharashtra.gov.in या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत करुन **दिनांक ०३/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन कन्फर्म करुन घ्यावे.

ज्या संस्था वरील नमुद दिनांकापर्यंत प्रवेशक्षमतेची माहीती अद्ययावत करणार नाहीत तसेच या कार्यालयाव्दारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अश्या संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत केला जाणार नाही, त्यामुळे होणा-या परिणामास सर्वस्वी जबाबदारी सबंधित संस्थेची राहील. याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.